**<u>विशेष दिवाणी दावा क्र. १३९/२०२३</u>**
**<u>संजय वि राजेंद्र</u>**
**<u>नि.क्र. २१ लगत</u>**

**<u>शपथेवर उलटतपास वादीचा प्रतिवादीतर्फे</u>**
**<u>विधीज्ञ श्री. आडके यांचेतर्फे सुरु</u>...**

१३. मी पानदुकान चालवितो. पानदुकानाव्यतीरीक्त माझा कोणताही दुसरा व्यवसाय नाही. मी मिळकती खरेदी विक्रीचा व्यवसाय करतो, हे म्हणणे खरे नाही. प्रतिवादी हा माझा नातेवाईक आहे. प्रतिवादी हा माझा नात्याने भाचा लागतो. मी प्रतिवादीच्या कुटुंबास चांगल्याप्रकारे ओळखतो हे म्हणणे खरे आहे. दावा जमीन वेणुबाई मोरे हीने प्रतिवादीस खरेदी दिल्याबाबत मी कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे. मी या अनुषंगाने खरेदीखत नि.२५ दाखल केलेले आहे.

१४. दावा जमीन प्रतिवादीने मला विक्री करण्याबाबत खरेदीखतात ठरलेले होते परंतु तसा वेगळा दस्त करण्यात आलेला नव्हता. खरेदीखत नि.२५ मध्ये मी पक्षकार आहे. मी सदर खरेदीखतात वेणुबाई मोरे या माझे आईचा मुख्त्यार धारक होतो. मी माझे आईचा मुख्त्यारधारक होतो हे दाखवण्यासाठी माझेकडे कागदोपत्री पुरावा आहे. नियमीत दिवाणी दावा क्र. १०२/२००६ हा दावा प्रलंबीत असतांना सदर खरेदीखत झालेले होते हे म्हणणे खरे आहे. प्रतिवादीस असलेल्या बहीण भावांबाबतही मला माहित आहे. दावा जमीन प्रतिवादीची वडिलोपार्जीत मिळकत आहे हे म्हणणे खरे नाही.

**(उर्वरीत उपलतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.)**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

**सही/—**

**(एम्. एम्. गादिया)**

**दि.२०/०७/२०२३.** **दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, सिन्नर.**

**शपथेवर वादीचा पुढील उलटतपास प्रतिवादीतर्फे**
**विधीज्ञ श्री. आडके यांचेतर्फे सुरु...**

१५.दावा जमीनीपैकी मी काही जमीन चार महिन्यांपूर्वी सिन्नर येथील खैरनार या व्यक्तीस खरेदी दिलेली आहे, हे म्हणणे खरे आहे. दावा गटातील जमीनींच्या सह—धारकांमध्ये आपापसात वाटप झालेले नाही, हे म्हणणे खरे नाही. सदर वाटपाबाबतचा कागदोपत्री पुरावा मी माझ्या वकीलांकडे दिलेला आहे.

१६.प्रतिवादी व माझे दरम्यान दावा जमीनीच्या खरेदी—विक्री बाबत कोणत्या तारखेस, महिन्यात किंवा वर्षात चर्चा झालेली होती हे माझ्या दाव्यात तसेच सरतपासात नमुद नाही, हे म्हणणे खरे आहे. प्रतिवादीस काय अर्थी गरज होती व त्यामुळे त्याने दावा जमीन विक्रीस काढली होती, याचाही उल्लेख माझ्या दाव्यात तसेच सरतपासात नाही, हे म्हणणे खरे आहे. प्रतिवादी व माझे दरम्यान दावा जमीनीबाबत झालेल्या कथीत विक्री कराराची तारीख, महिना व वर्ष मी दाव्यात तसेच माझे सरतपासात नमुद केलेले नाही, हे म्हणणे खरे आहे. सदर करार नोंदणीकृत नाही. सन २०१३ मध्येच प्रतिवादीने सदर कराराची मुळ प्रत नातेवाईकास दाखविण्यासाठी म्हणून माझ्याकडून नेलेली होती, परंतु त्याची निश्चीत तारीख किंवा महिना मला सांगता येत नाही. मी प्रतिवादीस सदर मुळ करारनामा पुन्हा कधी मागीतला याची तारीख, वर्ष व महिना दाव्यात तसेच सरतपासात नमुद नाही, हे म्हणणे खरे आहे. मी प्रतिवादीस मुळ करारनामा देतांना त्याची स्थळप्रत किंवा छायांकित प्रत माझ्याकडे ठेवलेली नव्हती. मी प्रस्तुत करारनामा करतांना श्री.पोंक्षे वकील यांचा सल्ला घेतलेला होता. सदर मुळ दस्ताची प्रत मी माझ्या सदर वकीलांकडेही ठेवलेली नव्हती.

१७.मी दाव्यातील कथीत करार नोटरीकडेही नोंदणी करुन घेतलेला नव्हता. प्रतिवादीने मला मुळ करारनामा परत दिला नाही म्हणून मी त्यास कायदेशिर

नोटीस पाठविलेली होती. या अनुषंगाने मी प्रतिवादी विरुध्द् कोणतीही पोलिस फिर्याद दिलेली नाही. मी दाखल केलेल्या पावत्यांमध्ये (नि.२९ ते ३३) नमुद असलेल्या रक्कमा या मी प्रतिवादीस प्रस्तुत कराराच्या मोबदल्यापोटी दिलेल्या होत्या, याचा उल्लेख नाही, हे म्हणणे खरे आहे. मी प्रतिवादीस दिलेल्या रु.२०,०००/— या रक्कमेची तारीख, वर्ष व महिना माझ्या सरतपासात नमुद नाही, हे म्हणणे खरे आहे. रक्कम देतांना तिची पावती घ्यावी, याची मला समज आहे. मी माझे आयकर विवरण भरतांना प्रतिवादीस दिलेल्या रक्कमेचा उल्लेख केलेला होता. सदर रक्कमा मी माझ्या आयकर विवरणात दाखविल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा आता माझ्याकडे नाही. प्रतिवादी व माझे दरम्यान दावा जमीनीबाबत विक्री करार झाला, हे मी खोटे सांगत आहे, हे म्हणणे खरे नाही. सदर मुळ कराराची प्रत मी प्रतिवादीच्या मागण्यानुसार त्याच्याकडे दिली होती, तसेच ती त्याने मला परत दिली नाही, हे मी खोटे सांगत आहे, हे म्हणणे खरे नाही. सदर मुळ करारनामा आजही माझ्याच ताब्यात आहे, हे म्हणणे खरे नाही.

**(उर्वरीत उपलतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.)**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

**सही/—**

**(एम्. एम्. गादिया)**

**दि.२६/०७/२०२३.** **दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, सिन्नर.**

**<u>शपथेवर वादीचा पुढील उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री.आडके यांचेतर्फे—</u>**

१८.मला प्रतिवादींना कथीत मोबदला रक्कम धनादेश किंवा बॅक हस्तांतरण सुविधेद्वारे देण्याची आवश्यकता वाटली नाही. दावा जमीनीबाबत माझी आई वेणुबाई व प्रतिवादीचे वडील पोपट वाजे यांच्या दरम्यान तहशिल कचेरीत वाद चालु होते, हे म्हणणे खरे आहे. दावा जमीनीबाबत वेणुबाई व पोपट वाजे यांच्या दरम्यान दिवाणी न्यायालयातही वाद चालु होता, हे म्हणणे खरे नाही. दावा जमीन सन १९६४ पूर्वी पासून पोपट वाजे यांच्या कब्जेवहिवाटीत होती, हे म्हणणे खरे नाही. दावा जमीनीबाबत वेणुबाई व पोपट वाजे यांच्या दरम्यान नियमीत दिवाणी दावा क्र.१०२/२००६ प्रलंबीत होता, हे म्हणणे खरे आहे. महसुल खटल्यांमध्ये वेणुबाई, जाईबाई वाजे व पोपट वाजे यांच्या दरम्यान दावा जमीनी संदर्भात आपापसात तडजोड झाली, व त्यानुसार प्रलंबीत सर्व दिवाणी दावे मागे घेण्यात आले, हे म्हणणे खरे आहे.

१९.जाईबाई वाजे ही माझी नातेवाईक आहे, हे म्हणणे खरे आहे. वेणुबाई, जाईबाई वाजे व पोपट वाजे यांच्या दरम्यान दावा जमीनी संदर्भात काय तडजोड झाली होती, याची मला माहिती नाही, परंतु सदर तडजोडीबाबतचे दस्त न्यायालयात उपलब्ध आहेत. सदर तडजोडी दरम्यान पोपट वाजे याने जाईबाई वाजे हीस दरमहा रुपये २५/— व तिला वार्षिक आवश्यक ती बाजरी द्यावयाची, असे ठरले होते, हे म्हणणे खरे नाही.

२०.प्रतिवादी व माझे दरम्यान उसनवारीचा व्यवहार होता, हे म्हणणे खरे नाही. सदर उसनवारीच्या व्यवहारापोटी मी प्रतिवादीकडून दि.१३.०३.२०१२ रोजी एक विसार पावती लिहून घेतली होती, हे म्हणणे खरे नाही.

**प्रश्न—**सदर उसनवार रक्कम प्रतिवादीने न फेडल्यास त्याने दावा जमीन मला खरेदी द्यावयाची, असे ठरलेले होते ?

(सदर उसनवार व्यवहाराच्या अनुषंगाने कोणताही कागदोपत्री दस्त प्रतिवादीतर्फे दाखल करण्यात आलेला नाही, त्यामुळे त्या अनुषंगाने प्रश्न विचारण्याचा प्रतिवादीच्या विद्वान वकीलांना अधिकार नाही, अशी हरकत वादीच्या विद्वान

वकीलांनी घेतली. जरी समजा सदर दस्त प्रतिवादीतर्फे दाखल करण्यात आलेला नसला तरीही कायद्याने सदर दस्ताच्या अनुषंगाने उलटतपासात प्रश्न विचारण्याचा अधिकार असतो. म्हणून सदर हरकत नामंजुर करण्यात येत आहे.)

**उत्तर—**असे काहीही ठरलेले नव्हते.

२१.वर नमुद उसनवार रक्कमेचा दस्त माझ्याच ताब्यात आहे, हे म्हणणे खरे नाही. सदर उसनवार / विसार पावतीसाठी प्रतिवादी व त्याच्या पत्नीच्या सहया मी कोऱ्या कागदांवर घेतलेल्या होत्या, हे म्हणणे खरे नाही. सदर दस्तावर मी अक्षय तानाजी झनकर व आशाबाई पुंजाजी शेजवळ यांची साक्षीदार म्हणून सहया मी घेतलेल्या होत्या, हे म्हणणे खरे नाही. सदर दस्तानुसार मी दस्त केल्यापासून दिड वर्षाच्या आत जमीन खरेदी करुन घेणार, असे ठरलेले होते, हे म्हणणे खरे नाही. प्रतिवादींनी दावा जमीन मला खरेदी देण्याबाबत व्यवहार कधीही केलेला नव्हता, हे म्हणणे खरे नाही. प्रत्यक्षात प्रतिवादी व माझे दरम्यानचा व्यवहार हा उसनवारीचाच होता, हे म्हणणे खरे नाही. प्रतिवादी कडून मला उसनवार रक्कम मिळाली नाही, म्हणून मी हा खोटा दावा दाखल केला आहे, हे म्हणणे खरे नाही. माझ्या सरतपासातील सर्व कथने खोटी आहेत व मी ही खोटी साक्ष देत आहे, हे म्हणणे खरे नाही.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

**सही/—**

**(एम्. एम्. गादिया)**

**दि.०२/०८/२०२३.** **दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, सिन्नर.**